# १०वी-१२वी अभ्यासाचं तंत्र आणि नंतर करिअर निवडीचा विचार
# आतापासूनच व अधिक गांभीर्याने करणे फायद्याचे.

सर्व साधारणपणे विद्यार्थी व पालक करिअर विषयीचा विचार व शोधाशोध १०वी-१२वी च्या परीक्षा झाल्यानंतर व निकालाच्या आधी करतात. परंतु बऱ्याचदा तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. कारण दोन-पाच मार्कांसाठी जेव्हा एखाद्या शाखेत किंवा कॉलेज मध्ये प्रवेश मिळत नाही तेव्हा आपल्याला वाटते कि अजून थोडा अभ्यास केला असता तर मनासारखी शाखा व कॉलेज मिळालं असतं. खरोखरच १०वी-१२वी म्हणजे करिअरच्या दृष्टीने आपल्या आयुष्यातील टर्निंग पॉइन्ट असतो. म्हणूनच नंतर पश्चाताप करण्यापेक्षा आतापासूनच त्याविषयी विचार केलेला फायदेशीर असणार आहे.

करीअर म्हणजे आर्ट्स, सायन्स, कॉमर्स किंवा फार फार तर मेडिकल-इंजिनियरिंगमध्ये प्रवेश असाच समज आपल्याकडे प्रचलीत आहे. परंतु यापलीकडे जाऊन करीअर म्हणजे नेमकं काय? आपला नैसर्गिक कल-कुवत काय? आपली आवड काय? यावर आधारित आपल्याला कोणते पर्याय उपलब्ध आहेत? यशस्वी करीअर घडवण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरतात? यात शिक्षण, आपला दृष्टीकोन, आपल्यातील कौशल्ये आणि सवयी यांचा किती वाटा असतो? आपलं व्यक्तिमत्व आणि करीअर यांचा काय संबंध असतो? या प्रश्नांची उत्तरे डोळसपणे शोधली तर आपापल्या आवडीच करीअर तर निवडता व घडवता येईलच परंतु त्यासोबत आपल्याला अपेक्षित यश, पैसा, प्रसिद्धी, समाधान, आनंद हे सर्वही मिळेल.

मुळातच करीअर म्हणजे नेमकं काय हे सर्वप्रथम समजून घेण्याची गरज असते. व्यक्तीच्या जीवनातील ठराविक काळासाठी प्रगतीची संधी असणारा व्यवसाय म्हणजे करीअर या पुस्तकी व्याख्येसोबत त्यात अजून बऱ्याच गोष्टींचा समावेश होतो. करीअर संबंधी आपला स्वतःचा दृष्टीकोन काय आहे? त्यातून आपल्याला काय हवं आहे? हा विचार प्रत्येकाने केला तर करीअरची निवड करणं सोपं होईल. अशाप्रकारे करिअरची दिशा आता ठरवली तर त्यासाठी आवश्यक पात्रता म्हणजेच मार्क इत्यादींची तयारी करून हवं ते करिअर घडवता येईल नाही का? ज्या गोष्टीचा आपल्या करीअरशी अत्यंत जवळचा संबंध असतो ती म्हणजे शिक्षण. किंबहुना आपल्या आयुष्यभर चालणाऱ्या करीअरच्या प्रवासातील पहिला आणि सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे त्या-त्या क्षेत्रातील शिक्षण. त्यानेच आपली पुढील करीअरची दिशा निश्चित होईल. या सर्व गोष्टींचा विचार करून अभ्यासाची तयारी करण्याला एक वेगळंच परीमाण लाभेल व त्यामुळे अभ्यास करणंही आवडीच होईल.

प्रत्येक क्षेत्रातील काही नामवंत व्यक्तींकडे बघितलं तर लक्षात येईल कि त्यांनी त्यांची करिअरची दिशा खूप लवकर निश्चित केली व त्यानुसारच प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांनी आपापल्या क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन केलं.

करिअरची दिशा ठरवण्यासाठी आज आपल्याकडे उपलब्ध असलेला सर्वोत्तम मार्ग म्हणजे वैज्ञानिक पद्धतींनी तयार केलेल्या "कल चाचण्या" व त्याबरोबर "तज्ञांकडून समुपदेशन"! या द्वारे आपण स्वतः आपल्या मधील गुणांबाबत जागरूक होतो आणि त्यांचा जास्तीत जास्त वापर आपल्या शैक्षणिक व वैयक्तिक प्रगतीसाठी करू लागतो. आपली अभायासाची पद्धत जाणून त्या पद्धतीने अभ्यास करून परीक्षांमध्ये जास्तीत जास्त व हवं असलेलं यश मिळवू शकतो. अशा यशासाठी आवश्यक असणाऱ्या सुधारणा आपल्यामध्ये घडवून आणू शकतो. आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची वेळीच उत्तरे मिळाली तर आणि शंकांचं समाधान झाले तर अजून जोमाने अभ्यासाला लागू शकतो. हे सर्व "वैज्ञानिक कल चाचण्या" व त्याबरोबर "तज्ञांकडून समुपदेशन" याद्वारे शक्य होतं. असं म्हटलं जातं कि "शांततेत घाम गाळला तर युद्धात कमी रक्त सांडाव लागतं" अभ्यासाचं तंत्र व करीअर या विषयी जास्तीत जास्त जाणून घेतलं तर अभ्यास करणं व पुढील निर्णय घेणे सोपे होईल, नाही का? महेंद्र जी. बैसाणे मो. 86523 40256 www.bharukaka.com